Pune Police

# बेकायदा अग्निशस्त्र बाळगणाऱ्या इसमाकडून दोन अग्निशस्त्रे व पाच काडतूसे जप्त..

आगामी गणेशोत्सवाचा काळ निर्विघ्नपणे पार पाडावा व कोणताही अनुचीत प्रकार घडू नये याकरीता योग्य ती प्रतिबंधक कारवाई करणेबाबत मा.पोलीस आयुक्त,पुणे, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे व मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे यांनी सुचना दिल्या होत्या.

सुचनाप्रमाणे कारवाई करीत असताना पोलीस नाईक अतुल साठे यांना बातमी मिळाली की, एक इसम कोरेगाव पार्क पोलीस ठाणेचे हद्दीत बेकायदेशीर रित्या अग्नीशस्त्र विक्री करीता येणार आहे अशी बातमी मिळालेल्या बातमीप्रमाणे कोरेगाव पार्क पोलीस ठाणेचे परिसरात सापळा लावून आरोपीत नामे गणेश कारभारी साबळे वय २८ वर्ष रा. मु.पो. पाणसवाडी ता.नेवासा जिल्हा अहमदनगर यास दिनांक २३/०८/२०१७ रोजी १६.४५ वा. ताब्यात घेतले. त्याचे अंगझडतीत दोन पिस्टल, पाच काडतुसे व रोख रूपये असे साहीत्य किं.रू १,०३,०००/- चे मिळून आले. आरोपीताकडे नमुद अग्निशस्त्र जवळ बाळगण्याचा परवाना नसल्याची खात्री झाल्याने त्याचेविरूध्द कोरेगाव पार्क पोलीस ठाणेत गु.र.नं १५५/२०१७ आर्म ॲक्ट कलम ३,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच दुसऱ्या कारवाईत वाहनचोरी गुन्ह्यास प्रतिबंध करणेकामी पिंपरी येथे सापळा लावून इसम नामे मोबीन मेहबुब शेख वय २२ वर्ष रा. मनाली हाऊसींग सोसायटी, फ्लॅट नंबर अ/२ नेहरूनगर पिंपरी पुणे यास पकडून त्याचेकडून हिरोहोंडा कंपनीची, लाल रंगाची, पॅशन प्रो मो.सा नंबर एम.एच.१४.एम.के.००६६ किं.रू ५०,०००/- ची यासह ताब्यात घेतले. नमुद गाडीबाबत त्याचेकडे तपास करता, त्याने ती नेहरूनगर, पिंपरी येथून चोरी करून तिच्यावर बनावट नंबर टाकून वापरत असल्याची खात्री झाल्याने त्यास सी.आर.पी.सी ४१(१)(ड) प्रमाणे दिनांक २३.०८.२०१७ रोजी २२.३० वा. अटक करण्यात आली आहे. सदर बाबत गुन्हा दाखल करण्याचे काम चालु आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त-१, यांचे मार्गदर्शनाखाली युनिट ३ गुन्हे शाखा चे सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र बाबर, सपोनि, अशोक भोसले, रोहीदास लवांडे, राजु रासगे, अनिल भोसले, गजानन गाणबोटे, महेंद्र पवार, सुजीत पवार, संदीप तळेकर, कल्पेश बनसोडे, सुधीर सोनवणे, यांनी केली आहे.

